


**एप्रिल १९८७ अंकावरून ❀ उत्तरार्ध**

**प. पू. सद्‌गुरू सिद्धयोगेश्वर महाराज**

ब्रह्मनिष्ट, ज्ञानी, समर्थतत्त्ववेत्ते, परमेश्वराचे अनन्य भक्त शिरोमणी, व शुभाशुभ कर्माच्या बंधनातून मुक्त झालेल्या महात्मायोगी कौंडिण्य मुनींची दुसऱ्याच्या कल्याणाच्या वासनेमुळे ही दशा झाली तर सामान्य जीवांची काय दशा होत असेल? असा विचार करीत ती वेश्या बाल कौंडिण्याजवळ गेली व तिने त्याला उचलून आपल्या मांडीवर घेऊन त्याच्याकडे एक टक पहात राहिली. हे पाहून ते बालक खदखदा हसू लागले; इतक्या दिवसांत बालकाला रडतांना किंवा हसताना कोणीहि पाहिले नव्हते. त्यामुळे दर्शनास आलेल्या सर्व लोकांना व त्याच्या आईवडिलांना आश्चर्याचा धक्का बसला. त्यानंतर वेश्येने सर्व लोकांना त्या बालकाच्या खोलीबाहेर जाण्याची विनंती केली. तिच्या विनंतीनुसार सर्व लोक बाहेर गेल्यावर, बालकास ती म्हणाली, "हे योगींद्र, आपण सर्व कर्मापासून अलिप्त राहून परब्रम्ह परमात्म्याचे भजन, सेवन करून सतत ब्रम्हांतच विहार करणारे ब्रम्हस्वरुप योगी असतांनासुद्धा आपली अशी गती होण्याचे कारण कोणते? हे ऐकताच ते नवजात बालक स्मित करून बोलू लागले, व म्हणाले, "हे पवित्र माते या पुनर्जन्माला कारण तूच आहेस. माझ्या अन्तःकाळी तुझ्या चरित्रहिन जीवनाचेच स्मरण करीत राहिल्यामुळे व ज्याच्या सहवासामुळे आपले सर्व पाप नाहिसे होऊन, जन्ममरणाच्या चक्रांतून सुटका होते, अशा महात्म्यांचा सहवास सोडून हे लोक तुझ्यासारख्या वेश्यांकडे येवून नरकाच्याद्वाराकडे का वळतात? याचे मला केवळ दयाबुद्धीमुळे दुःख होत असे; त्याचा परिणाम इतका वाईट झाला कीं, नेहमीच तुझ्याकडे येणाऱ्या प्रत्येकाबद्दल दुःख होऊ लागले. असे सतत चिंतन घडल्यामुळे अन्तःकाळीसुद्धा त्याच विचाराने घेरल्यामुळे माझे परमात्म्याचे अनुसंधान सुटले व माझी ही गती झाली "त्यावर ती वेश्या म्हणाली "मी चारित्र्यहिन व विषयवासनेनें लुब्ध होवून वाईट आचरण करणारी, कशी कां असेना, तुम्ही माझी उपेक्षा करावयास पाहिजे होती परंतु तसे न करता माझ्याबद्दल चिंतन करीत राहिलांत याचेच मला मोठे आश्चर्य वाटते. माझ्या-सारख्या एका पापिणीच्या उद्धारासाठी लक्ष्य लावल्यामुळे आपणास जन्ममरणाच्या फेऱ्यांत पडावे लागले, वास्तविक आपण ब्रम्हज्ञानी, भक्तशिरोमणी

**नामा म्हणे हरि उच्चार तू करी । उद्धरसी निर्धारी इहलोकी ॥**

तत्ववेत्ते; व सर्व वासनांचा त्याग केलेले महापुरुष! परंतु लोक सन्मार्गाने कां वागत नाहीत अशा अन्तःकाळी राहिलेल्या एकाच वासनेमुळे आपणास हे फळ मिळाले, असो आंता प्राप्त झालेल्या देहाचे भोग भोगल्याशिवाय यातून सुटका नाही. पण मी पापी, दुराचारीणी कुळांत कशी जन्माला आले त्याबद्दल पूर्व जन्माची गोष्ट मी आपणास सांगते.

जनकपूर नावाच्या एका नगरी, अत्यंत लावण्यवती अशी एक वेश्या होती; तिचे नाव पिंगला असे होते. माझी मालकीण माझ्यावर खुष व्हावी या उद्देशाने तिच्या विलासी वृत्तीला पसंत पडतील ; असे रोज नवे नवे पुरुष तिच्यासाठी मी आणीत असे परंतु कांही दिवसानंतर त्या वेश्येला अशा तऱ्हेचे अपवित्र जीवन जगण्याचा तिरस्कार निर्माण होऊन ती वैराग्य वृत्तीने राहू लागली. या क्षणभंगूर संसारावरील तिची आसक्ति नाहिशी होऊन ती केवळ परमेश्वरी चिंतनातच, आपला काळ घालवू लागली. तिने आपले सर्व जीवनच भगवंताच्या चरणी अर्पण केले. या ईश्वरी कृत्यांतहि मी माझ्या मालकिणीला अनन्य भावाने सहाय्य करीत असे. तिचे माझ्यावर एवढे सुसंस्कार झाले, कीं मीहि भगवान श्रीकृष्णाच्या भक्तित तल्लीन होवून भगवान श्रीकृष्णाच्या चरणी माझे सर्वस्व अर्पण केले परंतु माझे पूर्व जन्माचे भोग भोगून पूर्ण होण्यापूर्वीच माझ्यावर काळाची नजर पडून मला मृत्यु आला. उरलेले भोग भोगण्यासाठी मला हा जन्मप्राप्त झाला. या जन्मी आपल्यासारख्या पवित्र महात्म्यांच्या नित्य दर्शनाने, व स्मरणाने माझी बुद्धी पवित्र झाली. महाराज माझ्याकडे येणाऱ्या प्रत्येक मनुष्याला पाहून हा पापी आला असे म्हणून आपण दुःखी होत होतात. परंतु नित्य आपणाकडे येणारे संत, महात्मे, मुमुक्षू यांचे दुरुनच दर्शन घेऊन, मनानेच त्यांना वंदन करीत असे. या समर्थ महात्म्यांच्या दर्शनाने माझी सर्व पापे, नष्ट होत आहेत. हा विचार सतत मनांत येत राहिल्यामुळे उठतां बसतां, निजतां–खातां–पितां त्या महात्म्यांच्या चिंतनाच्या प्रभावाने माझ्या सर्व वृत्ती विराम पाऊन, अद्वितीय चीर शांतीची अनुभूती मला येऊ लागली. रात्रंदिवस त्या अनुभूतीतच मी स्थिर झाले. त्या चिंतनाच्या प्रभावानेच मला माझ्या व आपल्या पूर्वजन्माचे ज्ञान झाले. आता माझे जीवन म्हणजे एका भगवान श्रीकृष्णाची भक्ति हेच आहे. त्याच्याशिवाय एक क्षणभरहि मी जीवंत राहू शकणार नाही. रात्रंदिवस भजन, पुजन, ध्यान हे एका भगवंताचेच करीत असते. माझे नेत्र त्याच्या दर्शनाने पावन होतात. आजपर्यन्त एकहि कर्म भगवंताला अर्पण केल्यावाचून राहिले नाही. सत्पुरुषांवाचून मी दुसऱ्या कोणाचेही दर्शन केले नाही. एका भगवंताच्या प्राप्ति व्यतिरिक्त दुसरी कोणतीही आसक्ति माझ्या मनाला शिवली नाही. हे योगीराजा, आपण स्वतः ब्रह्मस्वरूप असूनसुद्धा, या मिथ्या वासनेमुळे भोग भोगित आहात व मी वेश्येच्या कुळीं जन्म घेऊनहीं, माझ्याकडे येणाऱ्या लोकांना भगवंताच्या गुण गौरवाची गाणी गाऊन त्यातून हा संसार असार आहे, म्हणून प्रत्येकाने परमेश्वराला प्राप्त करून घेण्याचा उपदेश करीत असे. आता माझ्या एकच गोष्ट लक्षात आली की **ज्ञानी पुरुषांनी सुद्धा मिथ्या गोष्टीत लक्ष घालणे हे मोक्षाला प्रतिबंधक ठरते. म्हणून मनुष्याने सर्वप्रथम वासनांचा त्याग करून मनःपूर्वक कर्म आणि वाणीने भगवंताचे भक्तिपूर्वक भजन, पुजन, ध्यान केले पाहिजे.** त्याचप्रमाणे शम, दम, विवेक संपादन करून, या दुःखमय भवसागरांतून बाहेर पडण्यासाठी, मनन आणि निदिध्यासाच्या योगे, परब्रह्म परमात्म्यांमधेच निमग्न राहिले पाहिजे. तरच या भवसागरातून मनुष्याला मुक्ती मिळू शकेल. अन्तःकाळची एक क्षणैक वासना मनुष्याला कोणत्या स्थितित नेते हे आपल्या उदाहरणावरून माझ्या पूर्णपणे लक्षात आले.

वेश्येचे भाषण ऐकल्यावर बालयोगीन्द्र महात्मा कौंडिण्य म्हणाले, "हे मुक्ते, जन्म आणि मृत्यु घडण्याला निमित्त मात्र कारण घडते. वास्तविक

**नामची समर्थ नामचि मथित । शंकरासी हेत रामनामी ॥**

सर्व शक्तिमान, सर्वसत्ताधीश, त्या जगन्नियंत्या परमात्म्याचाच हा खेळ असतो. त्याच्या इच्छेशिवाय या जगातील झाडांचे पानहि हलणार नाही, म्हणून **मनुष्यानें कर्तृत्व अभिमान सोडून सर्व वासनांचा त्याग करण्याचा सतत अभ्यास केला पाहिजे. शाश्वत शांती प्राप्त करून घेण्यासाठी द्वैताचा त्याग करून सर्व भूत-मात्रांमध्ये एकच परमात्मा आहे.** अशी दृढ श्रद्धा ठेवून एकत्वाचा अनुभव करून घेण्याचा प्रयत्न करणे हेच ब्रह्म साक्षात्काराचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. म्हणून जीवाने परमात्म्याची प्रेममय भक्ति करून, त्यातच तन्मय होवून राहिले पाहिजे. असे झाले तरच तो प्रेमळ करूणेचा सागर, परब्रम्ह परमात्मा आपल्या भक्ताला या भवसागरांतून तारून नेतो. याप्रमाणे दोघांचा संवाद झाल्यावर शेवटच्या जन्माचे भोग भोगून पूर्ण झालेली ती दोघेही भगवद्स्मरणांत तद्रुप होऊन निजधामास निघून गेली.

सांगण्याचे तात्पर्य एवढेच कि, ब्रम्हज्ञानी, योगी तत्त्ववेत्ते, शम, दम, विवेक, वैराग्यादी संपत्ती प्राप्त केलेल्या विरक्त लोकांनासुद्धा, क्षणिक वासना बंधनात टाकतात तर सामान्य संसारी लोकांची काय अवस्था होत असेल! म्हणून भगवंताच्या सतत स्मरणात राहून सर्व वासनांचा त्याग करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

# चला किर्तनाला जाऊ !

– शंकराचार्य जयंतीला शंकराच्या मंदिरात स्वामी शंकरानंद महाराजांचे किर्तन आहे. येतो का ?

– स्वामी शंकरानंदाचे का ? वेदांताचे पंडीत, तेच ना ? नको रे बा ! ते काय सांगतात ते कळतच नाही! मी एकदा गेलो होतो त्यांच्या किर्तनाला !

– अरे, वेदांताचे तत्वज्ञान सरळ सोप्या भाषेत सांगतात. आजकाल अशा अभ्यासू किर्तनकाराचे किर्तन ऐकायला मिळत नाही.

– कसले अभ्यासू अन कसले काय ?
म्हणें अंधारातील दोरीला अज्ञानाने साप म्हणून न घाबरता ज्ञानाच्या प्रकाशांत ती दोरी प्रत्यक्ष पहावी, म्हणजे आपण भयमुक्त होऊ ! कांही कळले कां ?

– बघू या तर, अंधारातील सापाची प्रकाशांत कशी दोरी होते ते !

हरीश चव्हाण

धन्य त्याचे कुळ सादर पै सुफळ । दिननिशी पळ रामनाम ॥